Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ४० ] शुक्रवार, डिसेंबर २६, २०२५/पौष ५, शके १९४७ [पृष्ठ १, किंमत : रुपये ५५.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा.,अ. क्र. ११२.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**अधिसूचना**

क्रमांक कार्या.३-मह.-संकिर्ण-कावि-२९१-२०२५. —

शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग, क्रमांक टी. एल. सी.१०७६-६३९२३-म६ दिनांक १ जुलै, १९७६ अन्वये, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महा. ४१ वा) याच्या कलम ४ पोट-कलम (१) च्या परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आलेल्या आहेत. त्याचा वापर करुन आणि उक्त कलम ४ च्या पोट कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वप्रसिध्दीनंतर मी, सावन कुमार, जिल्हाधिकारी, भंडारा याद्वारे दिनांक १५ डिसेंबर, २०२५ पासून भंडारा जिल्हयाच्या पवनी तालुक्यातील पेंढरी या पुनर्वसीत गावाचे खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या हद्दी असलेल्या व भंडारा जिल्हयाच्या पवनी तालुक्यातील पेंढरी (पुनर्वसन) या नांवाने ओळखण्यात येणाऱ्या गावांत रुपांतर करीत आहे.

**अनुसूची**

| तालुका | मुळगाव | मुळ सोनेगाव गावांत राहणारे भूमापन क्रमांक | पेंढरी (पुनर्वसन) नावाने रुपांतर पुनर्वसीत गावठाणाचे भूमापन क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| पवनी | सोनेगाव | १ ते ४९, ५०/२, ५१/२, ५४/१ ५५ ते ११५, ११७ ते ४४३ आणि या व्यतिरिक्त रस्ते, नाले व नदी समाविष्ट असलेले स्थानिक क्षेत्र | ५०/१, ५१/१, ५२, ५३, ५४/२, ११६ आणि यामधील रस्ते, नाले व नदी समाविष्ट असलेले स्थानिक क्षेत्र |

भंडारा :
दिनांक २४ डिसेंबर, २०२५

**सावन कुमार** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, भंडारा.

ना.एक-१ (१८९४).



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.